प्रेस नोट

## ऑनलाईन ईमेलदवारे टेंडरचे आमीष दाखवुन पैसे लुबाडणा-या सराईत गुन्हेगाराला सायबर क्राईम सेल याचेकडुन अटक

गेल्या चार पाच महिन्यांपासुन ऑनलाईन टेंडरचे आमिष दाखवुन फसवणुक करण्याचे प्रकार झालेचे अर्ज पुणे सायबर क्राईम सेल येथे प्राप्त् झाले होते. सदर अर्जांचा तपास करीत असताना आरोपी हा पुणे शहर परीसरात असलेचे व तो आपले अस्तीत्व् लपविण्यासाठी वारंवार आपला टिकाणा बदलत असल्याचे निर्दशनास आले. अशाच एका अर्जात तपास करीत असाताना पोलीस उपनिरीक्षक नितीन खामगळ व टिम यांना आरोपी तेजस शहा याची माहिती मिळाली.तेजस शहा हा अश्याप्रकारच्या गुन्हयांमध्ये पटाईत असुन त्याच्या विरोधात भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत व तो सध्या आपले अस्तीत्व् लपवुन राहत आहे.पोलीस उपनिरीक्षक नितीन खामगळ व त्यांच्या टीमने अथक परीश्रम घेवुन तेजस शहा याच्या वास्त्व्याचा शोध घेवुन त्याला ताब्यात घेतले व विश्रामबाग पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले. याबाबतचे सविस्त्र माहिती खालीलप्रमाणे

फिर्यादी अझर तांबोळी यांचा संगणक विक्रीचा व्यवसाय आहे.टिळक रस्ता परिसरात त्यांची साईराज टेक ईनफ्रा प्रा.लि.नावाची कंपनी आहे. यामार्फत ते संगणक पुरविण्याचे काम करीत करतात. दरम्यानच्या काळात तेजस शहा याने त्यांच्याशी ईमेलदवारे संपर्क साधला व आपले नाव सुनिल चव्हाण असे सांगुन ‘आपण एम्स हॉस्पीटल भोर येथे परचेस मॅनेजर असुन आमच्या हॉस्पीटला कॅम्प्युटरची आवश्यकता असून ते टेंडर मी आपल्याला मिळवुन देतो. त्यासाठी आपण मी दिलेल्या अकांउटवर पैसे जमा करा.तसेच आमच्या ईमेल आयडी वर आपली कागदपत्रे जमा करा’अशी बतावणी केली .आरोपीने दिलेल्या अकांउटवर पैसे जमा केल्यानंतर आरोपी तेजस शहा याने तांबोळी यांचे फोन कॉलस टाळणयास सुरुवात केली व काही कालानंतर ते फोन बंद करुन टाकले.ऑनलाईन फसवणुक झालेने अझर तांबोळी यांनी

सायबर क्राईम सेल येथे ऑनलाइन फसवणुकीसंर्दभातला अर्ज दाखल केला . सदर अर्जाचा तपास करीत असताना सायबर क्राईम सेल मधील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक नितीन खामगळ व टीम यांनी आरोपी नामे तेजस शहा वय ३२ वर्षे रा आबेगाव बुदुक पुणे याचा शोध घेवुन ताब्यात घेतले.सदर आरोपीने चिंचवड पोलीस ठाणे येथेही गुन्हा केल्याचे उघड झाले आहे.सदर आरोपीकडुन अधिक गुन्हे उघड होण्याची शकयता आहे.तरी नागरीकांनी आपली वर नमुदप्रमाणे फसवणुक झाली असल्यास सायबर क्राईम सेल पुणे यांचेशी संपर्क साधावा. टेंडरबाबत ईमेल कींवा फोनदवारे एखादयाने संपर्क केल्यास संबंधीत कपंनी/संस्था यांच्या अधिकत वेबसाईवर अथवा कार्यालयाच्या ठिकाणी जावुन त्याबाबत खात्री करावी.

सदर आरोपीस विश्रामबाग पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असुन विश्रामबाग पोलीसं मार्फत अधिक तपास चालु आहे. सदर कारवाईमध्ये वरिष्ठ पोलीस निारिक्षक राधिका फडके, पोलीस उपनिरीक्षक नितीन खामगळ , पो.शि योगेश वावळ, पो.शि. राहुल हंडाळ,मपोशि पुजा डहाळे, पो.शि. संतोष जाधव , पो शि शिरीष गावडे,पोलीस हवालदार अस्लम अत्तार यांनी सहभाग घेतला.